26-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/25/2025 11:27 PM Page 1

आंबिये महाविद्यालय पाहून भारावले विद्यार्थी..!

आरोबा-धारगळ येथील मांगिरीश विद्यालयाची भेट; ७० विद्यार्थ्यांचा सहभाग

■ टीम दैनिक हेराल्ड

विर्नोडा, दि.२५ : सुसज्ज जिमखाना, आधुनिक तंत्रज्ञानाने नटलेल्या स्मार्ट क्लासरुम, कोणत्याही माणसाला ग्रंथांशी मैत्री करायला भाग पाडेल असे विशाल ग्रंथालय, गोमंतकीय संस्कृतीचा वारसा सांगून तिचे संवर्धन करणारे पुरातत्त्व केंद्र, अंतराळासंदर्भातील घटकांची माहिती देणारे अवकाश केंद्र, विद्यार्थ्यांसाठी संशोधन केंद्रे, खेळासाठी मैदान, बटरफ्लाय पार्क आणि बॉटानिकल गार्डन, कावी कलेचा वारसा सांगणाऱ्या कलाकृती, पेडण्याची लोकसंस्कृती, आहारशास्त्र विशद करणारी महाविद्यालयाच्या भिंतीवरील चित्रे या महत्त्वपूर्ण बाबींमुळे विर्नोडा येथील आंबिये महाविद्यालय राज्यातील शाळांच्या आकर्षणाचा बिंदू ठरत आहे. आरोबा-धारगळ येथील मांगिरीश विद्यालयाने संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयाला भेट दिली. यामध्ये ७० विद्यार्थ्यांचा समावेश होता. आंबिये महाविद्यालयातील पुरातत्त्व केंद्रामध्ये असणाऱ्या पुरातत्त्वीय अवशेषांसंदर्भात विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. त्यांना पुरातत्त्व केंद्राचे मुख्य समन्वयक डॉ. रोहित फळगावकर आणि प्रा.साईराज भट यांनी मार्गदर्शन केले. त्याचवेळी त्यांनी महाविद्यालयाचे ग्रंथालयही पाहिले. महाविद्यालयाचे आकर्षण असलेले बॉटानिकल गार्डन पाहून वेगवेगळ्या वनस्पती, झाडे यांचे शास्त्रीय महत्त्व विद्यार्थ्यांनी समजून घेतले.

यावेळी विद्यार्थ्यांसोबत मांगिरीश विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर यांच्यासह जयमाला सावंत, जास्मिन दोडामणी, अंकिता पेडणेकर, सर्वेश सांगळे, प्रणय परब, प्रसन्ना, विश्राम फराज, अर्चना हरमलकर, शंकेश किनळेकर, समीर तुळसकर आदी शिक्षकांचा सहभाग होता. कोकणी विभाग प्रमुख प्रियंका परब यांनी या भेटीचे समन्वयन केले. त्यांना प्रा. रिमा कांदोळकर आणि प्रा. अलिशा शेटगावकर यांनी सहकार्य केले.

अवकाश केंद्राने विद्यार्थ्यांना घातली भुरळ

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे स्थापन करण्यात आलेले अवकाश केंद्र पाहून विद्यार्थी भारावले. प्रा. ॲंड्रेल गोम्स यांनी अवकाशीय घडामोडींसंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विर्नोडा : आंबिये महाविद्यालयाला भेट दिल्यानंतर आरोबा-धारगळ येथील मांगिरीश विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर यांच्यासोबत विद्यार्थी व शिक्षक वर्ग.

कावी कला, पेडण्याची संस्कृती आणि आहारशास्त्र

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कावी कलेच्या माध्यमातून रेखाटलेल्या कलाकृती, पेडण्यातील लोकसंस्कृती आणि आहारशास्त्र यांचे दर्शन घडविणारी चित्रे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कावी कला, पेडण्याची लोकसंस्कृती आणि आहारशास्त्र समजून घेतले.

मडुरा ग्रामपंचायतीची इंटरनेट सेवा बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. २५ : मडुरा ग्रामपंचायतीची इंटरनेट सेवा महिनाभर ठप्प असल्याने ग्रामस्थांना डिजिटल सुविधांचा लाभ घेण्यास अडथळा निर्माण झाला आहे. ग्रामस्थांना विविध कामांसाठी इंटरनेट सेवा नसल्यामुळे माघारी परतावे लागत आहे. कोलमडलेल्या बीएसएनएल इंटरनेट सेवेचा फटका गावातील सर्वसामान्य ग्रामस्थांना बसत आहे. बीएसएनएल अधिकाऱ्यांनी तत्काळ सेवा सुरू करावी, अशी मागणी उपसरपंच बाळू गावडे यांनी केली.

उपसरपंच गावडे म्हणाले की, ग्रामपंचायतीची इंटरनेट सेवा महिनाभर बंद असल्यामुळे ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आवश्यक कागदपत्रांसाठी तालुका कार्यालयात जावे लागते. ज्यामुळे त्यांना वेळ आणि पैसा दोन्हीचा खर्च करावा लागतो. तसेच जन्म-मृत्यू दाखले, बिल भरणे आणि इतर कामांसाठीही त्रास सहन करावा लागत आहे. डिजिटल सुविधांचा लाभ घेता येत नाही, ज्यामुळे त्यांना सरकारी योजना आणि सुविधांची माहिती मिळण्यासही अडचणी येत असल्याचे श्री. गावडे यांनी सांगितले.

मडुरा ग्रामसेवक यांनी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी आमचे कॉन्ट्रॅक्ट संपले, असे सांगितले.

सेवा बंद झाल्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे. आवश्यक कागदपत्रांसाठी बांदा किंवा सावंतवाडी येथे जावे लागत असल्यामुळे जास्त खर्च करावा लागतो आणि वेळ वाया जातो. ग्रामपंचायत मधील सरकारी कामांमध्येही अडथळे येतात, ज्यामुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देत तत्काळ सेवा सुरू करावी, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ पांडुरंग सातार्डेकर व मोहन गवस यांनी दिली आहे.

पान १ वरून

ठरलं! पाकिस्तानला एक थेंबही पाणी जाणार नाही!

बांधवांवर हल्ला करत आहेत हे दुःखद आहे. या वेळी आपल्याला एकत्र येऊन दहशतवादाचा पराभव करायचा आहे. या घृणास्पद कृत्याविरुद्ध लढण्यासाठी आणि दहशतवादाला कायमचा पराभूत करण्यासाठी आपण एकजुटीने उभे राहिले पाहिजे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पहलगाम हल्ल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा केली आहे.पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला.त्यांनी सांगितले की, या दुःखाच्या वेळी फ्रान्स भारत आणि त्यांच्या जनतेसोबत खंबीरपणे उभा आहे. त्यांनी असेही म्हटले की, फ्रान्स, त्याच्या मित्र राष्ट्रांसह, आवश्यकतेनुसार दहशतवादाविरुद्ध लढत राहील.

कॅसिनोधारकांच्या फायद्यासाठी सरकारकडून जमीन वाटप

याशिवाय, पणजी-बेती फेरी सेवा देखील कॅसिनोंच्या सोयीसाठी थांबवण्याची शक्यता आहे.

बायलांचो साद संस्थेच्या संयोजिका सबिना मार्टिन्स या निर्णयावर आक्षेप घेत म्हणाल्या की, राज्य सरकार टीसीपी कायद्यातील नियम बदलून मर्यादिपलीकडचा एफएआर मंजूर करत आहे, हे कायद्यातील प्रक्रियेचे उल्लंघन आहे. ओडीपी २०३१ मध्ये सदर क्षेत्र मनोरंजन झोन म्हणून नमूद असून, त्यात ३०० टक्के एफएआरला परवानगी नाही. याशिवाय हा भाग पूरप्रवण क्षेत्र आहे. सार्वजनिक स्थळांचा खाजगीकरण होणे हा गंभीर प्रश्न असून, नागरिकांनी याविरोधात उभे राहणे आवश्यक आहे.

पणजीमधील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. ओडेट लोबो यांनीही सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले, राजधानी शहराचा बिघाड सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे होत आहे. एकेकाळी लेखा संचालनालय असलेल्या इमारतीचा वापर आता कॅसिनो चालवण्यासाठी खाजगी ऑपरेटरकडे दिला जात आहे. ही मालमत्ता नागरिकांच्या गरजांसाठी वापरण्याऐवजी, ती केवळ कॅसिनोंच्या फायद्यासाठी वापरली जात आहे.

पाकिस्तानच्या निर्णयामुळे भारतीय विमान सेवा महागणार

कामकाजावर मोठा दबाव निर्माण होईल. विमानांना मध्यवर्ती ठिकाणी उतरण्यासाठी अतिरिक्त लँडिंग शुल्क, इंधन खरेदी आणि अतिरिक्त पायलट्सच्या सेवांचा खर्च लागणार आहे. यामुळे, ग्राहकांना अधिक महागडे तिकिटे मिळू शकतात.

पाकिस्तानच्या या निर्णयामुळे केवळ भारतीय विमान कंपन्यांचेच नुकसान होईल असे नाही. पाकिस्तानला देखील ओव्हरफ्लाइट शुल्कातून मिळणारे महसूल गमवावे लागेल. २०१९ मध्ये, भारतीय विमान कंपन्यांसाठी पाकिस्तानी हवाई क्षेत्र बंद केल्यामुळे पाकिस्तानला सुमारे ५० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले होते. तथापि, पाकिस्तानने फक्त भारतीय विमान कंपन्यांसाठी हे निर्बंध लादले आहेत. त्यामुळे, दिल्लीहून उड्डाण करणाऱ्या परदेशी विमान कंपन्यांना पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करण्यात काही अडचण येणार नाही, आणि त्यांचा खर्च वाढणार नाही. यामुळे, परदेशी विमान कंपन्यांना भारतीय कंपन्यांच्या तुलनेत स्पर्धात्मक फायदा मिळू शकतो.

सर्वसाधारणपणे, पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांसाठी हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेतल्याने भारतीय विमान कंपन्यांच्या खर्चात आणि प्रवाशांच्या तिकिटांच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे, पाकिस्तानी हवाई क्षेत्राच्या बंदीचे परिणाम भारतीय विमान कंपन्यांच्या वित्तीय स्थिरतेवर आणि ग्राहकांच्या अनुभवावर दीर्घकालीन परिणाम करू शकतात.

BEFORE THE JOINT MAMLATDAR V OF BARDEZ TALUKA, MAPUSA, BARDEZ, GOA
Mutation Case No: 101041 Village: Reis Magos
Michael Charles D'Souza, Residing at Pilerne, Bardez, Goa .....Applicant
V/s
1. Rosaria Basilia Cecilia 2. Angusta De Souza 3. Agnelo Bernadino de Souza 4. Francisco Xavier de Souza 5. Henrique Antonio de Souza ....Opponents
PUBLIC NOTICE
To all Opponents / Legal Heirs / any other interested parties
Whereas the applicant Michael Charles D'Souza, Residing at Pilerne, Bardez, Goa has applied for mutation under section 96 of L.R.C. 1986 to include his name in the occupant column under survey No. 63/0 of Village Reis Magos, as the applicant have acquired right in the said property as per Deed of Sale, Book -1 Document registered number 552 at pages 438 to 462 Book No. 1 Volume No. 590 dated 24.04.1997 executed before Sub Registrar Ilhas.
Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some notices could not be served and returned unserved with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.
And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.
All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.
Mapusa, Dated: 15/04/2025
Sd/- **Meghana Naik**
Jt Mamlatdar V of Bardez Seal

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CALANGUTE BARDEZ - GOA
VP/Cal/F-19/2025-26/ 441
Dated : 25/04/2025
NOTICE INVITING QUOTATION
Sealed Quotations are invited from eligible Dealers / Companies for the following:-
Erection of 20 mt stadium flood lights (01 no.) At Poriat Football ground at Tivai Vaddo, V.P. Calangute
The interested eligible Dealers / Contractors / Companies should submit the application for the issue of Quotation form upto **05/05/2025 at 11:00 am** and the quotations will be opened on **08/05/2025 at 3:00 pm** at the V.P. Office.
You may contact this panchayat office for more details.
The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotations without assigning any reason thereof.
This quotation is issued as per the resolution no. IX J (195) dated 16/04/2025.
Sd/- Seal
(Shri. Joseph R. Sequeira) Sarpanch,
V. P. Calangute

VILLAGE PANCHAYAT UCASSAIM - PALIEM - PUNOLA, BARDEZ - GOA
Ref. No:- VP/UPP/Quotation Notice/ 2025-2026/ 84 Date:- 25/04/2025
QUOTATION NOTICE
The Sarpanch of V.P. Ucassaim Paliem Punola invites sealed quotations on behalf of V.P. Ucassaim Paliem Punola, Bardez, Goa, from registered/ authorized suppliers/dealers/ Agencies for supply of following items/goods of popular brand for the year 2025-2026.

Sr. No	Particulars	Qty
1	16 Amps Switch	16.00 nos.
2	2.5 Sq Mm Wire	6.00 Coils
3	1 Inch Casing Patti	60.00 nos.
4	½ Inch Casing Patti	40.00 nos.
5	2 Modular Surface Box	4.00 nos.
6	3 Modular Plate	4.00 nos.
7	3 Modular Surface Box	4.00 nos.
8	18 Modular Surface Box	1.00 nos.
9	18 Modular Plate	1.00 nos.
10	1 Modular Plate	1.00 nos.
11	Surface Light	4.00 nos.
12	12 Way Spn Db	3.00 nos.
13	Insulation Tape	5.00 nos.
14	Fan Regulator	13.00 nos.
15	12 Moudular Plate	11.00 nos.
16	12 Modular Matel Box	11.00 nos.
17	16 Way Double Door SPN	1.00 nos.
18	4 Way Mcb 63 Amps	2.00 nos.
19	16 Amps MCB	40.00 nos.
20	Alkathene Pipe ½ Inch	4.00 nos.
21	15 Amps Socket	30.00 nos.
22	15 Amps Switch	35.00 nos.
23	5 Amps Switch	66.00 nos.
24	5 Amps Socket	14.00 nos.
25	CAT-6 Wire	200 mtrs.
26	4 Sq Mm Wire	13.00 coils
27	2 Modular Metal Box	8.00 nos.
28	2 Modular Plate	12.00 nos.
29	Fan D- Claim	9.00 nos.
30	Fan Rod 2 Fit	9.00 nos.
31	1.5 Wire	16.00 Coils
32	Panasonic Light (15W)	25.00 nos.
33	Fan Rubber Claims	9.00 nos.
34	Ceiling Fan	5.00 nos.
35	Tube Tight (20W)	6.00 nos.
36	PVC Tap	10.00 nos.
37	15 AMP top 3 pin	8.00 nos.
38	12 modular surface box	8.00 nos.
39	½ Inch Flexiable pipe	20.00 mts.

The sealed quotation should reach to this office on **06/05/2025 before 10.00 a.m.** and it will be opened on **06/05/2025 at 10:30 a.m.** during the meeting in presence of authorized dealers/suppliers if any.
TERMS AND CONDITIONS : **1.** The rates quoted shall be per item or box or bundle of different specification inclusive of GST/VAT or any other type of taxes payable to government. **2.** The rates quoted shall be applicable for all purchases made during financial year 2025-2026 up to 31-03-2026. **3.** The Panchayat reserves the right to accept or reject any or all quotations without assigning any reason thereof. **4.** The payment shall be cleared to the supplier only after verifying that goods received are in good condition. **5.** No delayed payment charges or interest shall be paid to the supplier incase if any delay in making the payment.
Sd/-
Seal (Riya Mayekar) Sarpanch, Village Panchayat Ucassaim Paliem Punola

CHANGE OF NAME
I **Henna Sheik** w/o Ahmad Khan r/o h.no E-734 Gogol Margao Goa would like to correct my daughters name from **Bushra Ahmad Naser Khan** to **Bushar Ahmad Khan** herein after in all her dealings and documents she will be known by her new name **BUSHRA AHMAD KHAN.**

CHANGE OF NAME
I, **Milagrina Greta Mascarenhas** resident of H. No 794 Chadlea Wado Assolna, South - Goa and holder of Indian Passport bearing no. S5376185 would like to change my name from **Milagrina Greta Mascarenhas e Fernandes** to **Milagrina Greta Mascarenhas.** Hereafter in all my dealings and documents I will be known by my new name **Milagrina Greta Mascarenhas.**
Sd/-
Milagrina Greta Mascarenhas.

BEFORE THE JOINT MAMLATDAR-V OF BARDEZ TALUKA MAPUSA, BARDEZ GOA
Mutation Case No: 99460
Village: Reis-Magos
Noorjahani Ibrahimshaikh alias Nurjahan Bi, Mushtaq Shaikh, Rubina Shaikh, All R/o H.No 218/B, Ramnagar, Betim, Bardez, Goa ...Applicant
V/s
1. Shaikh Ibrahim 2. Mariam Bi Shaikh 3. Sameer Shaikh 4. Mehrunnisa Shaikh ...Opponents
PUBLIC NOTICE
To all opponents /legal heirs/any other interested parties
Whereas the applicant Mrs. Noorjahani Ibrahimshaikh alias Nurjahan Bi, Mushtaq Shaikh and Rubina Shaikh, All R/o H.No. 218/B, Ramnagar, Betim, Bardez, Goa, has applied for mutation under Section 96 of L.R.C. 1968, to include their names in the occupant column under survey No. 64/1-Al of village Reis-Magos, after deleting the existing name of Shaikh Ibrahim from the occupant column, as the applicant have acquired right in the said property admeasuring an area of 600 Sq. mts, As per Inventory Proceedings No. 176/2023/A, decided on 01/08/2024, In the Court of the Civil Judge Senior Division, "A" Court at Mapusa, Goa.
And whereas the notices in Form no. X were served to all the interested parties by registered A/D. However some A. D. card returned back with the Postal remarks "Party Expired/Party Left/Not Known/Address out of Station" and he do not known the detailed addresses of the Legal heirs and whereabouts of the interested parties.
And whereas the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the address of the interested parties.
All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the Certifying Officer.
Place: Mapusa Date: 10/04/2025
Sd/- (Meghana Naik)
Jt. Mamlatadar —V of Bardez SEAL

TRANSFER OF VEHICLE
I, **Smt. UJWALA S NAIK Wife of Late SANDEEP K NAIK** H.no 242 ,NANDANVAN RESIDENCY PATANTALLY, QUELA PONDA,NORTH GOA,GOA 403401. Would Like to Transfer the Vehicles Bearing ***Reg.No.** GA-05-K-9831, **NEW SUZUKI ACCESS *Reg.No.**GA-05-B-8923, **MARUTI SUZUKI RITZ VXI**
On **my name.**
If anybody has any objection they should inform to RTO Office PONDA within 15 days from the Publication of this Notice.
SD/-
Smt. UJWALA S NAIK

Office of the Civil Registrar cum Sub Registrar, Mormugao, Goa
Shop No. 1 & 2, Karma Empress Building, Ground Floor, Near KTC Bus Stand, Vasco da Gama, Goa
NO. CR/SR / MOR / 296 / 2025 Dated 11/04/2025
Office of the Civil Registrar-Cum -Sub Registrar and Special Notary Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-cum-Sub Registrar and Special Notary in the said Judicial Division.
In accordance with the section 346(11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012", it is hereby made public that by a Deed of **Qualification of Heirs** dated 11/04/2025, drawn by and before me Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary, Mormugao at Vasco-da-Gama, at pages 80 to 84 of Notarial Book No. 203 of this office, the following is recorded:
That late Kissan S. Naik alias Kissan Sitaram Naik alias Kissan S. Naik, died on 07/07/2022 , at Goa Medical College, Bambolim Goa, intestate without any will or gift or any other testamentary disposition of the his last wish but leaving behind his widow Smt. Latha Nocul Shetye changed to Latha Kissan Naik alias Kirtika Naik, as his moiety sharer and his three children, namely, (one) Vinay K. Naik married to Sapna Santosh Narvekar changed to Vidita Vinay Naik, (two) Vishaka K. Naik changed to Vishaka Sachin Naik married to Sachin Pandurang Naik, and (three) Priyanka Kisan Naik changed to Priyanka Chandrakant Shirodkar married to Chandrakant Vasant Shirodkar, as his Sole and Universal heir. And besides them, there being no one else in terms of law of succession still in force in this State of Goa who may prefer or concur along with them to the inheritance left by the said deceased person.
Any person having objection to this deed may file their objection in this office within one month from the date of its publication.
Mormugao Dated11/04/2025 Seal
Sd/- **Tushan Gurudas Kunkolienkar**
Special Notary, Mormugao

व्हायकाउंट ऑफ हायस्कूलमध्ये भित्तिपत्रक स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २५ : पाणी हे जीवन आहे म्हणून जीवनासाठी ते अत्यंत आवश्यक आहे. मानव, प्राणी आणि वनस्पती हा विचार केला तर एकूणच पृथ्वीवरील सर्व जीवधारी हे पाण्यावर अवलंबून आहेत. पाण्याशिवाय जीवन आपण कल्पनाच करू शकत नाही. शुद्ध पाणी हे पिण्यासाठी, शेती-भातीसाठी, उद्योग धंद्यासाठी, एकंदरच काय तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी अत्यावश्यक आहे. पाणी या भूमीवर विविध रूपात अस्तित्वात आहे. जसे की, समुद्रात, नद्या नाल्यात, तलावात, विहिरीत, साठवलेल्या धरणात तर राहिलेले भूमिगत स्थितीत ते आढळते.

आज जलस्तोत्रांच्या वाढत्या वापरामुळे, पाण्याच्या होणाऱ्या दुरुपयोगामुळे, दूषित पाण्यामुळे पाणीटंचाई ही अत्यंत गंभीर समस्या येऊन उभी ठाकली आहे. यासाठी पाणी संवर्धन होणे काळाची गरज आहे. शाळा शिक्षा आणि साक्षरता मिशन, शिक्षा मंत्रालय भारत सरकार यांनी आयोजित जल पखवाडा या अंतर्गत ७व्या दिवशी व्हायकाऊंट ऑफ पेडणे हायस्कूल पेडणे येथे ६ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी भीतीपत्रक स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला व आपल्या कल्पकतेने पाण्याचे महत्व चित्रातून स्पष्ट केले. सदर स्पर्धा शाळेचे चित्रकला शिक्षक श्री राजमोहन शेटये यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेत उत्कृष्ट अशी पाच चित्रे निवडण्यात आली. त्यात हर्षिता देसाई (६वी) प्रथम, रिहान परब (६वी) द्वितीय, कविता सावंत (७ वी) तृतीय, तर सायनी आपुले व रेषा मांजरेकर अनुक्रमे यांना उत्तेजनार्थ बक्षिसे प्राप्त झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीप्तेज गाड, कृष्णा कांबळी व विक्रांत नाईक यांनी सहकार्य केले. स्पर्धा संयोजक म्हणून कलाशिक्षक राजमोहन शेट्ये यांनी काम पाहिले.

डिचोली : मेणबत्ती फेरीत सहभागी झालेले खासदार सदानंद शेट तानावडे, आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, प्रेमेंद्र शेट व इतर.

डिचोलीत पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ मेणबत्ती फेरी; मृतांना वाहिली श्रद्धांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २५ : पहलगाम काश्मीर येथे दहशतवाद्यांकडून पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ डिचोली व मये भाजप युवा मोर्चातर्फे डिचोली शहरात मेणबत्ती फेरी काढून या हल्ल्याचा जोरदार निषेध करण्यात आला. त्याचप्रमाणे या हल्ल्यात मृत पावलेल्या २६ जणांनाही श्रद्धांजली वाहण्यात आली.

या हल्ल्याचा संपूर्ण देशभर निषेध होत असताना भारत सरकार तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे कडक पावले उचलणार असून या दहशतवाद्यांना आहे तिथून शोधून काढून त्यांना कठोर शासन दिले जाणार आहे. असे यावेळी या मेणबत्ती फेरीत सहभागी झालेले खासदार सदानंद शेट तानावडे यांनी सांगितले.

पहलगाम कश्मीर येथे झालेला अतिरेकी हल्ला हा अत्यंत निंदनीय असून विशेष करून तेथे असलेल्या पर्यटकांना त्यांची जात विचारून त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून त्याची गंभीर दखल केंद्र सरकारने घेतली आहे. संपूर्ण देशभरात या हल्ल्याचा निषेध होत असताना त्या दहशतवाद्यांना योग्य ते शासन करण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलली आहे. संपूर्ण देशाने याबाबतीत केंद्र सरकारला पाठिंबा देताना सरकार बरोबर रहावे, असे आवाहन खासदार सदानंद शेट तनावडे यांनी केले.

त्याचप्रमाणे या अतिरेकी कारवायांमध्ये सामील असलेल्या पाकिस्तानचा त्यांनी यावेळी निषेध केला.

या मेणबत्ती फेरीत डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट, जिल्हा पंचायत अध्यक्ष शंकर चोडणकर, नगरसेवक कुंदन फळारी, सुदन गोवेकर, दीपा शिरगावकर, अनिकेत चणेकर, उपनगराध्यक्ष दीपा पळ, रंजना वायंगणकर, अपर्णा फोगेरी तसेच डिचोली व मये मतदारसंघातील विविध पंचायतींचे सरपंच, उपसरपंच, पंचसदस्य, भारतीय जनता युवा मोर्चाचे तसेच मंडळ समितीचे पदाधिकारी व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुन्या बस स्थानकावरून सुरू झालेली मेणबत्ती फेरी डिचोली बसस्थानकापर्यंत आल्यानंतर तेथे खासदार तानावडे यांनी उपस्थितांना संबोधित केले व मेणबत्त्या बसस्थानकाच्या कठड्याला लावून मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर या फेरीची सांगता झाली.